## दि.१३/०८/२०१९ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिची सभेचा कार्यवृत्तांत.

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा.आयुक्त यांचे कक्षामध्ये दि.१३/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजीत करण्यात आली होती. या सभेस खालील सन्मा.सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

मा.आयुक्त, अध्यक्ष
मा.श्री.श्रीचंद तेजवाणी, सदस्य
मा.श्री.इमरान अब्दुल सईद, सदस्य
मा.श्री.प्रदिप हिवसे, सदस्य
मा.श्री.प्रशांत डवरे, सदस्य
मा.श्री.धिरज हिवसे, सदस्य
मा.सौ.वंदना मडघे, सदस्या
मा.सौ.प्रमिला जाधव, सदस्या
मा.श्री.मधुभाऊ घारड, तांत्रिक सदस्य
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.१
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.२
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.३
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.४
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.५
मा.स.सं.न.र. अधिकारी, मनपा अमरावती
मा.पर्यावरण अधिकारी, मनपा अमरावती
मा.कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.अमरावती
(तर्फे श्री.घोमकाळे, श्री.ए.आर.सोनोने, श्री.एस.झेड. काझी, असि.इंजिनीअर)
मा.उद्यान अधिक्षक म.न.पा.अमरावती

मा.उद्यान अधिक्षक यांनी मा.सभापती वृक्ष प्राधिकरण समिती यांचे परवानगीने सभेची सुरुवात करण्यात आली.

विषय पत्रीकेतील

**विषय क्र.१:-** दि.०९/०७/२०१९ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचे कार्यवृत्तांत समितीच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आले. सर्व सदस्यांनी अवलोकन केले. तसेच सदर कार्यवृत्तांत मधील झोन क्रमांक २ अंतर्गत अर्ज क्र.२, ३ मधील ठरावामध्ये फांद्या काढण्याची परवानगी देण्यात यावी अशी दुरुस्ती श्री.मधुभाऊ घारड तांत्रिक सदस्य यांनी सुचविली व अर्ज क्र.६ मधील ठरावामध्ये फांद्या काढण्याबाबत दुरुस्ती सन्मा.सदस्य श्री.हिवसे यांनी सुचविली.

**विषय क्र.२ :-** दि.०९/०७/२०१९ रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्तांत निर्णयाप्रमाणे कार्यपुर्ती अहवाल समिती समोर वाचून दाखविण्यात आला. समितीने सभेच्या कार्यवृतांताच्या कार्यपूर्ती अहवालाचे अवलोकन केले. तसेच झोन ३ च्या कार्यपुर्ती अहवालप्रमाणे इतर झोन च्या कार्यपुर्ती अहवालामध्ये सुध्दा परवानगीचा दिनांक व अर्ज क्रमांक/जावक क्र. पुढील सभेपासून समाविष्ठ करण्यात यावा अशी दुरुस्ती श्री.घारड यांनी सुचविली. मा.सभापती यांनी सर्व कार्यपूर्ती अहवाल व इतर अहवाल सारखे व उभ्या फॉरमॅट मध्ये असावेत असे निर्देश दिले.

**विषय क्र.३ :-** झोन क्र. १ ते ५ चे वृक्ष अधिकारी यांचेकडे प्राप्त अर्जाबाबत त्यांनी सादर केलेल्या अहवालावर चर्चा करुन निर्णय घेणे.

**उत्तर झोन क्र.१**

**अर्ज क्र.१:—** श्री.उ.य.गोळे रा.केवल कॉलनी क्र.२, अमरावती. १ निंब, १ बोधंनी, १ वड, १ मुंगना वृक्ष / वृक्षा च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — श्री.उ.य.गोळे यांचे दि.१८/०७/२०१९ रोजी केलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने संबंधितांना नोटीस बजावण्यात आलेली आहे. संबंधिताकडुन खुलासा प्राप्त झाल्यानंतर अहवाल मा.वृक्ष प्राधिकरण समितीस सादर करण्यात येईल माहितीस सविनय सादर.

**ठराव क्र.१:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. पुढील सभेत सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२:—** उपविभागिय अभियंता, सा.बां.विभाग, अमरावती. वादळाने पडलेले १ गुलमोहर वृक्षाची विल्हेवाट लावण्याची तसेच २० विविध वृक्षांच्या धोकादायक फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.



Scanned by CamScanner

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — दि.०२/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असून मा.तांत्रिक सदस्य यांनी वृक्ष वादळाने पडल्याचे दिसुन आले. वादळाने पडलेल्या वृक्षाची विल्हेवाट लावण्याची अर्जदारास परवानगी देण्यात यावी. तसेच त्या वृक्षाचे बदली तीन वृक्ष इतरत्र लावण्याची कार्यवाही करुन वृक्ष प्राधिकरणास अहवाल सादर करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास सुचित करावे लागेल. तसेच परिसरात असणाऱ्या इतर २० वृक्षांच्या फक्त धोकादायक फांद्या तोडण्याची परवानगी प्रदान करण्यात हरकत नसावी.

**ठराव क्र.२:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येते. वृक्षांच्या ३ ते ४ इंच डायमीटर पर्यंत फांद्या काढण्यात याव्या.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.३:—** श्री.कमलेश लक्ष्मी डागा डी.मार्ट समोर कॅम्प, अमरावती. ३ भिंगरी, १ निम, ३ पलस, ३ साग, ३ चिंच, ३ बदाम, १ मुंगना, १ बेर, १ शिवबाबुळ, वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जाचे अनुषंगाने मा.तांत्रिक सदस्य यांच्या कडुन वेळोवेळी स्थळ निरीक्षण करण्यात आलेले आहे. दि.०२/०८/२०१९ रोजी मा.तांत्रिक सदस्याकडून व ससंनर विभागाचे अभियंता यांच्या समवेत पुन्हा प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आलेले आहे. यापुर्वी दि.०१/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करुन ससंनर विभागाला दि.०१/०७/२०१९ रोजी पत्राव्दारे नियमानुसार किती वृक्ष होती व कोणती काढावयाची आहेत याबाबत नकाशावर हिरवा व लाल रंगानी चिन्हांकिंत करावयाची होती परंतु ससंनर विभागाने प्रत्यक्ष तसे केल्याचे दिसुन येत नाही. तसेच दि.२४/०६/२०१९ चे स्थळ निरीक्षणात प्रत्यक्ष १९ वृक्ष अर्जदाराचे प्लॉटवर उभी होती. त्यानंतर दि.१८/०७/२०१९ रोजी फेरपाहणी केली. दोन्ही वेळेस सुचना देवूनही ससंनर विभागाचे अभियंता उपस्थित नव्हते. त्यामुळे पुन्हा सर्व वृक्षांची प्रत्यक्ष मोजणी केली व नावासह वृक्षासंवंधी पत्र देण्यात आले. दि.०२/०८/२०१९ चे स्थळ निरीक्षणावेळी ससंनर विभागाचे अभियंता श्री.भटकर व अर्जदार यांचे प्रतिनिधी श्री.ठाकुर व इतर २ उपस्थित होते. परंतु असे निदर्शनास आले की, अर्जदाराने सर्व ११ वृक्ष जेसीबीने तोडून मुळासकट काढुन टाकलेली आहेत व जी वृक्ष त्यांना काढावयाची होती तेवढीच शिल्लक ठेवलीत म्हणजेच ८ वृक्ष शिल्लक ठेवून ११ वृक्ष अवैधपणे काढुन नष्ट केलेली असल्याबाबत मा.तांत्रिक सदस्य यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. तसेच मा. तांत्रिक सदस्य यांनी खालील प्रमाणे दंड आकारण्याबाबत शिफारस केलेली आहे. अवैध तोडलेली वृक्ष ११x३=३३ वृक्ष लावण्याचे फर्मावण्यात यावे व त्यासाठी ३३x३४६०=१,१४,१८०/- अनामत रक्कम तर दंड म्हणुन ११x५०००= ५५,०००/- असे एकुण रक्कम रु. १,६९,१८०/- अर्जदाराकडुन वृक्ष प्राधिकरणाकडे भरुन घेण्यात यावीत व तसे नोटीसव्दारे कळविण्यात यावे. त्यानंतर काढावयाच्या ८ वृक्षांबाबत वृक्ष प्राधिकरणाने निर्णय घ्यावा तुर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी असे मा.तांत्रिक सदस्य यांच्याकडुन प्रस्तावित करण्यात आलेले आहे. अहवाल मा.वृक्ष प्राधिकरण समितीचे अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र.३:-** सदर बाबत दोन विषय वेगवेगळे असून क्र.१. अवैध वृक्षतोड, क्र.२ वृक्ष तोडण्याच्या परवानगी बाबत आहे. अवैध वृक्षतोडीबाबत वृक्ष अधिकारी यांचे अहवालाप्रमाणे मान्य करण्यात येत असून वृक्ष परवानगी बाबत काढावयाच्या ८ वृक्षाबाबत प्रती वृक्ष ३ प्रमाणे (धोरणानुसार) प्रती वृक्ष ३४६०X३= ८३०४०/- रुपये अनामत रक्कम अर्जदाराकडून भरुन घेवून परवानगी द्यावी. परवानगी प्रमाणे काढावयाचे वृक्ष संबंधित झोन ने अर्जदारास दाखवून द्यावे व याबदल्यात अर्जदाराला ३३+२४=५७ मोठी वाढणारी वृक्षाची लागवड करुन दर सहा महिन्यांनी तीन वर्षापर्यंत अहवाल सादर करावा असे कळवावे. व सुचविण्यात आलेली वृक्ष लागवड परवानगी प्राप्त दिनांकापासून एक महिन्याच्या आत पुर्ण करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.४:—** सचिव, शिवाजी शिक्षण संस्था पंचवटी चौक, अमरावती. ६ निलगिरी, ३ निम, १ महारुख, वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — मा.तांत्रिक सदस्य यांच्याकडुन दि.०२/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली असून परिपक्व व वय झालेल्या ६ निलगिरी वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात हरकत नसल्याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे. तसेच त्याबदल्यात एकुण ६x३=१८ वृक्ष लावण्यासाठी १८x३४६०=६२२८०/- (बासष्ट हजार दोनशे ऐंशी रुपये फक्त) वृक्ष प्राधिकरण ठेव ठेवल्यानंतर तसेच वृक्ष लावल्याचा व वृक्ष सुस्थितीत असल्याबाबतचा फोटोसह अहवाल दर सहा महिन्याने तीन वर्षापर्यंत नियमाप्रमाणे प्राप्त झाल्यानंतर ठेव परत करण्याचे अटीवर परवानगी देण्यात यावी. अर्जदाराला अर्जात नमुद तीन वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात हरकत नाही. अहवाल मा.वृक्ष प्राधिकरण समितीचे अवलोकनाथ्र व उचित निर्णयार्थ सविनय सादर.

**ठराव क्र.४:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. संस्थेने वृक्ष लागवड करुन दर सहा महिन्यांनी तीन वर्षापर्यंत अहवाल सादर करावा. व सुचविण्यात आलेली वृक्ष लागवड परवानगी प्राप्त दिनांकापासून एक महिन्याच्या आत पुर्ण करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

**अर्ज क्र.५:—** श्री.दिपक लक्ष्मण वानखडे. रा.मोहन नगर, नवसारी अमरावती. १ निंब वृक्ष च्या फांद्या काढल्याबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल —मा.तांत्रिक सदस्य यांच्याकडुन दि.०२/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असून कडुलिंबाचा वृक्ष रस्त्यावर सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेला व हिरवागार होता. अर्जदाराने वृक्षाच्या फांद्या पुर्वीच मोठ्या प्रमाणात काढुन टाकलेल्या आहेत. तसेच रस्त्यावरील सप्तपर्णी वृक्षाच्याही फांद्या बिना परवानगी छाटुन टाकल्याचे दिसुन आले. अर्जदाराला विना परवानगनी कडुलिंब वृक्षाची मोठ्या प्रमाणात छटाई केल्याबाबत नोटीस बजावण्यात आली. यावेळी श्री.वानखडे अर्जदार यांनी श्री.मिश्रा वृक्ष अधिकाऱ्याचे प्रतिनिधी यांनी सांगितले की मनपाचे शक्तीमान व्दारा फांद्या काढल्या आहेत. त्यावरुन मा.तांत्रिक सदस्य यांनी चौकशी करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत सुचीत केलेले आहे. अहवाल मा.वृक्ष प्राधिकरण समितीचे अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सविनय सादर.
**ठराव क्र.५:-** सदर बाबत पुन्हा तपासणी करुन घ्यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.६:—** श्री.प्रशांत विश्वनाथ नाफडे रा.हार्दीक कॉलनी व्ही.एम.व्ही. रोड, अमरावती. १ नारळ वृक्ष काढण्याची परवानगी नाकरणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — मा.तांत्रिक सदस्य यांच्याकडून दि.०२/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असून नारळाचा वृक्ष छान वाढलेला व फळांनी लादलेला व हिरवागार आहे. शेजाऱ्यांच्या त्रासामुळे वृक्ष काढण्याचा अर्ज केला असे अर्जदाराने स्थळ निरीक्षणावेळी सांगितले त्यामुळे वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. याबाबत अर्जदाराशी चर्चा करण्यात आली असून त्याबाबत अर्जदाराचे समाधान झालेले आहे. अहवाल मा.वृक्ष प्राधिकरण समितीचे अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सविनय सादर.
**ठराव क्र.६:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.७:—** श्री.प्रमोद इंगोले उपअभियंता मनपा उत्तर झोन क्र.१ अमरावती. ११ विविध वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — मा.तांत्रिक सदस्य यांनी दि.०२/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असून काढावयाच्या वृक्षाला सहा इंच आकाराची पिवळ्या पेन्टची पट्टी करुन त्यावर लाल/पिवळ्या पेन्टनी क्रमांक घालण्याच्या सुचना दिल्या. हा रस्ता फार वाहतुकीचा व अत्यंत निकडीचे रुदीकरण करण्याची गरज असलेला नाही. त्यावर फार वाहतुक नाही. तथापि रुंदीकरणात किती वृक्ष वाचविले जावू शकतात याबाबत क्रमांक घातल्यानंतर फेर पाहणी करण्यात येईल. तुर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. कडुलिंबासारखे मोठे वाढलेली वृक्ष येथे आहेत व या वृक्षाच्या सावलीत शेजारी असलेल्या विविध कार्यालयात येणाऱ्या व्यक्तीना सावली उपलब्ध होते व त्यांची वरदळ (वाहनाची नाही) येथे अधिक असते तेव्हा वृक्ष तोडण्याबाबत गंभीरपणे विचार करावा लागेल. याबाबत मा.तांत्रिक सदस्य यांनी अहवाल दिलेला आहे. प्राप्त अहवाल मा.वृक्ष प्राधिकरण समितीचे अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सविनय सादर.
**ठराव क्र.७:-** वृक्ष काढण्याची परवानगी नाकरण्यात येत असून तांत्रिक सदस्यासोबत वृक्ष अधिकारी, शहर अभियंता, यांनी पुन: पाहणी करुन अहवाल द्यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.८:—** श्रीमती यमुनाबाई वामनराव थोरात रा.भिमनगर, अमरावती. १ आंबा वृक्ष / वृक्ष्या च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — पाहणी करणेकरीता अर्जदाराच्या घरी गेले असता घरी कुलुप असल्यामुळे वृक्ष पाहणी करता आली नाही.
**ठराव क्र.८:-** सदर बाबत पुन:पाहणी करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.९:—** श्री.हनुमंत दे.भोम्बे रा.आशियाड कॉलनी, अमरावती. १ शिवबाभुळ वृक्ष / वृक्ष्या च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — पाहणी करणेकरीता अर्जदाराच्या घरी गेले असता अर्जदार घरी उपस्थित नसल्याने वृक्षाबाबत माहिती मिळु शकली नाही. तसेच अर्जदाराशी संपर्क केले असता नमुद वृक्ष हे मनपा मार्फत काढल्याचे समजले.
**ठराव क्र.९:-** सदर बाबत पुन:पाहणी करुन अहवाल सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

**अर्ज क्र.१०:—** कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती. १४२ विविध वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — यापुर्वी मा.वृक्ष प्राधिकरण समिती सभा दि.२६/०४/२०१९ चे ठराव क्र.२ अन्वये वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात आली होती. तसेच सदर्हू रस्त्यावरील डी.पी. व विद्युत खांब हटवण्याबाबत सुचीत करण्यात आले होते त्या अनुषंगाने दि.०२/०८/२०१९ चे पत्रानुसार आवश्यक कार्यवाही सार्वजतिनक बांधकाम विभागामार्फत करण्यात आली असून पुनश्चः वृक्ष काढण्याची परवानगीची मागणी करण्यात आलेली आहे. करीता माहिती व उचित निर्णयास सादर.

**ठराव क्र.१०:-** सा.बां.विभागातर्फे वृक्ष प्राधिकरण सभेत श्री.घोमकाळे असि.इंजीनिअर व इतर दोन असि.इंजीजिअर हजर होते त्यांनी वृक्षाचे ट्रान्सप्लान्ट करण्याची यंत्रणा संबंधित कंत्राटदाराकडून उपलब्ध करुन देता येईल असे म्हटल्यामुळे सर्वप्रथम एकुण १४२ वृक्षापैकी जी वृक्ष ट्रान्सप्लान्ट करता येतील ती वृक्ष ट्रान्सप्लान्ट संबंधित कत्राटदाराकडून करुन घ्यावी यासाठी प्रथम प्रयत्न करावा व सदर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे, त्याबदल्यात ४२६ वृक्ष लागवड करुन दर सहा महिन्यांनी तीन वर्षापर्यंत वृक्ष जगण्याचा अहवाल वृक्ष प्राधिकरणाकडे सादर करावा लागेल. त्याबदल्यात १४७३९६०/- रु.अनामत रक्कम संबंधिताकडून जमा करुन घ्यावी. तसेच वृक्ष काढण्याच्या पूर्वी सदर रस्त्यावरील विद्युत खांब, डि पी व अतिक्रमण काढण्यात यावे व जास्तीत जास्त वृक्ष वाचविण्याचा प्रयत्न करण्यात यावा या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.११:—** श्री.श्यामकांत शंकरराव उल्हे, अमरावती. १ वृक्ष / फांद्या काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — दि.२४/०६/२०१९ रोजी तांत्रिक सदस्य समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता, अर्जदाराचा व वृक्षाचा दरान्वये देखील संबंध नाही. झाड रस्त्याचे कडेला, मनपा ने लावलेले असून छान वाढलेला आहे. कोणतीही अडचण नाही वृक्ष/फांद्या तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. तसेच अर्जदाराचे घरी एकही वृक्ष नाही व त्याचे घरासमोर हा वृक्ष नाही त्यांना मनपा क्षेत्र झाडाचे जतन व संरक्षण अधिनियम १९६५ नुसार सेक्शन ५, कलम ९(१) नुसार २ वृक्ष १५ जुलै पर्यंत लावण्याचे फर्मविण्यात यावे व फोटोसह अहवाल देण्याचे सुचित करावे. असा अहवाल मा.तांत्रिक सदस्य यांच्याकडुन प्राप्त झालेला आहे. तसेच सदरच्या झाडा खालच्या भागाला उधळी लागलेली आहे. करीता माहिती व उचित निर्णयास सादर. दि.०९/०७/२०१९ वृक्ष प्राधिकरण समिती चे ठराव क्र.१२ नुसार पाहणी केली असता झाडाला लागलेली उधळी वाढलेल्या स्वरुपात दिसुन आली. सदर वृक्ष सार्वजनिक रस्त्यावरील असल्यामुळे उद्यान विभागामार्फत काढण्याची कार्यवाही करावी लागेल. करीता माहिती व उचित निर्णयास सादर.

**ठराव क्र.११:-** सदर वृक्षाला उधळी लागली किंवा नाही याबाबत तांत्रिक सदस्य, सहा.आयुक्त व उद्यान अधिक्षक यांनी पाहणी करावी व निर्णय घेवून कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१२:—** सौ.सोनाली स.करेसिया, सन्मा.नगरसेविका, अमरावती. १ पिंपळ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — पिंपळ वृक्ष छान वाढलेला व हिरवागार असून रस्त्याचे कडेला आहे. कोणतीही अडचण दिसुन आली नाही. वृक्ष काढायचा व का ? तोडायचा याचा माहिती देण्यासाठी कोणीही उपलब्ध नव्हते. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. अशा स्वरुपाचा मा.तांत्रिक सदस्यांचा अहवाल प्राप्त झाला आहे. परंतु वृक्षाची पाहणी केली असता मनपा रस्त्याचे कडेला असलेला वृक्ष आहे. वृक्षाला मधातुन तळा गेलेला आहे. त्यामुळे वारा वादळामुळे वृक्ष पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उद्यान विभागाव्दारे धोकादायक भाग काढण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. करीता माहिती व उचित निर्णयास्त सादर.

**ठराव क्र.१२:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून वृक्ष अधिकारी यांच्या उपस्थितीत उद्यान विभाग संबंधित कंत्रादाराव्दारे वृक्षाचा धोकादायक भाग काढण्याची कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१३:—** समस्त नागरीक श्री.सुधाकर मधुकर दांडगे यांचे घराजवळ न्यु हनुमान नगर, अमरावती. १ महारुक्ष वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल — प्रकरण वेळेवर प्राप्त झाल्यामुळे स्थळ निरीक्षण करता आले नाही. करीता प्रस्तुत प्रकरणी स्थळ निरीक्षण करुन पुढील सभेत मंजुरीकरीता सादर करण्यात येईल. माहितीकरीता सादर. तसेच विद्युत तारांना स्पर्श करणाऱ्या फांद्या MSEB मार्फत काढण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र.१३:-** सदर महारुख वृक्षाच्या फांद्या काढण्याबाबत परवानगी द्यावी व आवश्यकता वाटल्यास उद्यान विभागाची मदत घेण्याबाबत कळवावे.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

**अर्ज क्र.१४:—** श्री.प्रभाकर तु. कुसरे, अमरावती. १ नारळ व १ पाम वृक्ष / फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल —प्रकरण वेळेवर प्राप्त झाल्यामुळे स्थळ निरिक्षण करता आले नाही. करीता प्रस्तुत प्रकरणी स्थळ निरीक्षण करुन पुढील सभेत मंजुरीकरीता सादर करण्यात येईल. माहितीकरीता सादर.
**ठराव क्र.१४:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. तांत्रिक सदस्य सोबत पाहणी करुन मा.सभापतीच्या मान्यतेने निर्णय घेण्यात यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**क्र.१५** —अमरावती कुऱ्हा कौंडण्यपुर रा.म. चे HAM अंतर्गत रस्ता रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामामध्ये मनपा क्षेत्रातील अडथडा निर्माण करणारी वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा.तांत्रिक सदस्यांचा अहवाल पुढीलप्रमाणे:- आज दि.१२/०७/२०१९ रोजी तसेच नंतर दि.१८/०७/२०१९ व १९/०७/२०१९ रोजी संपूर्ण रस्त्याचे व वृक्षाचे स्थळ निरीक्षण केले त्यावेळी वृक्ष प्राधिकरणाचे श्री.विजय भोसले, वृक्ष अधिकारीचे प्रतिनिधी उपस्थित होते. दि.१२/०७/२०१९ ला झोन क्र.१ व झोन क्र.३ चे वृक्ष अधिकारी तथा सहा.आयुक्त, उद्यान अधिक्षक, अभियंते इत्यादींचे उपस्थितीत रस्त्यावरील सर्व वृक्षाचे निरीक्षण करण्यात आले. मागिल दिलेल्या सुचनांचे पालन झाल्याचे दिसून आले. अर्जदाराने दि.२८/०६/२०१९ ला केलेल्या अर्जात रस्त्याचे उजविकडील १८२ व डावीकडील २०१ अशी एकूण ३८३ वृक्ष काढण्याची मागणी केली होती. तथापि, प्रत्यक्ष निरीक्षणानंतर दिलेल्या सुचनेनेसार रस्त्याचे डाविकडील ९० व उजविकडील ११ असा एकुण १०१ वृक्ष काढण्याची विनंती दि.०६/०७/२०१९ रोजीचे पत्रानुसार केलेली आहे. त्यात २८२ वृक्ष वाचविण्यात आली आहे. रस्त्याचे कामात अडचण ठरणाऱ्या वृक्षाची उपरोक्त तारखेला पुनरपाहणी केली व रस्त्याचे डावीकडील ६९ व उजविकडील ९ वृक्ष काढण्याचे अंतीमत: ठरविण्यात आले म्हणजेच या रस्त्यावरील एकुण ७८ वृक्ष काढावी लागतील ती काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

तथापि, काढाव्या लागणाऱ्या ७८ वृक्षापैकी खालील नमुद २३ वृक्ष दुसरीकडे उचलून लावण्याची तजविज करण्यात यावी(Transplant) त्यासाठी मशिनरीचा वापर करण्यात यावा व दुसरीकडे विद्यापीठ आवारात अथवा मनपाच्या उद्यानात वृक्ष काढून पुनरोपित करण्यात यावी व उर्वरीत ५५ वृक्ष तोडण्याची परवानगी अर्जदारास देण्यात यावी. त्याबदली वृक्षलावण्यासाठी ५५x३=१६५. १६५x३४६०=५,७०,९००/-(पाच लाख सत्तर हजार नऊशे रुपये फक्त) ठेव ठेवण्याचे आदेशित करुन १६५ स्थानिक प्रजातीची वृक्ष लागवड करण्याचे निर्देशित करण्यात यावे.

तसेच उर्वरीत सर्व वृक्षांना दगडी आळे (१x१ मीटर) करुन वृक्ष निगा राखण्याचे काम अर्जदारांनी करावे. तसेच रस्त्याचे दुतर्फा प्रति ४ मीटर दर वृकृष लावल्या जातील याची काळजी घ्यावी व अहवाल दर सहा महिण्यांनी वृक्ष अधिकारी (झोन क्र.१ व झोन क्र.३ ) यांना सादर करावा.

वरील अहवालात नमुद प्रमाणे ३० वृक्ष प्रत्यारोपन (Transplant) करण्याबाबत संबंधित उपविभागिय अभियंता, सा.बां.उपविभाग क्र.१ अमरावती यांना दि.०२/०८/२०१९ रोजी पत्र देण्यात आले आहे. करीता टिप्पणी सादर.
**ठराव क्र.१५:-** रस्त्याचे डावीकडील ६९ व उजविकडील ९ वृक्ष काढण्याचे अंतीमत: रस्त्यावरील एकुण ७८ वृक्ष काढावी लागतील ती काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

तथापि, काढाव्या लागणाऱ्या ७८ वृक्षापैकी खालील नमुद २३ + ७ = ३० वृक्ष (दि.०२/०८/२०१९ रोजीचे सा.बां.विभागाला देण्यात आलेले पत्र) दुसरीकडे उचलून लावण्याची तजविज संबंधित कंत्राटदाराकडून करण्यात यावी(Transplant) व दुसरीकडे संत गाडगे बाबा विद्यापीठ आवारात अथवा मनपाच्या उद्यानात किंवा त्याच रस्त्याच्या कडेला वृक्ष काढून पुनरोपित करण्यात यावी यासाठी प्रथम प्रयत्न करावा व वृक्ष तोडण्याची परवानगी अर्जदारास देण्यात येत आहे. त्याबदली ७८x३=२३४, २३४x३४६०=८,०९,६४०/-(आठ लाख नऊ हजार सहाशे चाळीस रुपये फक्त) ठेव ठेवण्याचे आदेशित करुन २३४ स्थानिक प्रजातीची वृक्ष लागवड करण्याचे निर्देशित करण्यात येते.

तसेच उर्वरीत सर्व वृक्षांना दगडी आळे (१x१ मीटर) करुन वृक्ष निगा राखण्याचे काम अर्जदारांनी करावे. तसेच रस्त्याचे दुतर्फा प्रति ४ मीटर दर वृक्ष लावल्या जातील याची काळजी घ्यावी व अहवाल दर सहा महिण्यांनी वृक्ष अधिकारी (झोन क्र.१ व झोन क्र.३ ) यांना सादर करावा. या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**मध्य झोन क्र.२**
**अर्ज क्र.१:-** श्री.राजेंद्र प्रल्हादराव पंढरपुरकर रा.हॉटेल श्रीपाद मागे नोर्शी रोड, अमरावती. २ कडूनिंब, १ काशिद वृक्ष विनापरवानगी तोडल्याबाबत.



Scanned by CamScanner

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.२६/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, कडुलिंब व काशीद वृक्ष मनपाने ट्रीगार्ड मध्ये रस्त्याच्या केला लावली आहेत. अर्जाराने वृक्षप्राधिकरणाला अर्ज केल्यानंतर त्यांनी नियमानुसार प्रतिक्षा केली नाही व वृक्ष अर्ध्यातून तोडून टाकलीत. फोटो जोडली आहेत व अवैध वृक्ष तोड केली तसेच सार्वजनिक आगेवरील विनापरवानगी तोडून टाकल्याबद्दल नियमानुसार दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करावी लागेल. तसेच दंड न भरल्यास IPC नुसार कारवाई करण्यात येईल याबाबत कळविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.१:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य अहवालानुसार पत्र द्यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२:-** श्री.रमेश ब. सावरकर रा.शारदा नगर अमेय अपार्टमेंट जवळ, अमरावती. १ नारळ वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.२६/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, नारळाचा छान वाढलेला वृक्ष हिरवागार व फळ आलेला आहे. कोणतीही अडचण दिसून आली नाही. शेजारी रसिक श्राफ यांनी झाड तोडण्याबाबत तगादा लावला असल्याने श्री.श्राफ यांचे घराचे परीसर निरीक्षण त्यांचेकडे एकही मोठा वृक्ष नाही. सबब श्री.श्राफ यांना म.रा.नागरी क्षेत्रा वृक्षाचे संबंधीत जतन अधिनियम १९७५ चे प्रकरण ५ सेक्शन कलम ९(१) सबसेक्शन नुसार नोटीस देवून दोन वृक्ष घरी लावण्याचे फर्माविण्यात यावे. व १५ ऑगस्ट २०१९ पर्यंत लावल्याचा अहवाल मागवावा. अहवाल प्राप्त न झाल्यास दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करावी. व अर्जदारास वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी व वृक्षाला कोणतीही इजा पोचवू नये असे फर्माविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.२:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.३:-** श्री.माणीकचंद ब. जालाण रा.अंबापेठ उजबावाडी जवळ, अमरावती. १ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.२६/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, विद्युत रोहीत्राकडे तसेच घराकडे झुकलेल्या दोन (२) इंच डायमिटर पर्यंतच्या फांद्या काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला लावलेला असून हिरवागार सरळ वाढलेला भरदार वृक्ष आहे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.३:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.४:-** वरीष्ठ पोलिस निरीक्षक, पोलिस ठाणे राजापेठ अमरावती शहर, अमरावती. १ गुलमोहर, १ उंबर, १ कडुनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.२६/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, ड्युटी ऑफिसर श्री.इंगळे उपस्थित होते झाडाच्या फांद्या पडण्यचाची शक्यता असल्याने अर्जदाराने फोनव्दारा सुचना देवून काढून घेतल्या. सबब, वृक्षाच्या फांद्या काढण्याचे कार्यवाहीत कार्योत्तर मान्यता द्यावी. व यापुढे परवानगी शिवाय वृक्षाच्या फांद्या अथवा वृक्ष तोडू नये असे फर्माविण्यात यावे. करण वृक्ष नष्ट होऊ शकतात अतांत्रिक पध्दतीमुळे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.४:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य वृक्षाच्या धोकादायक फांद्या काढण्याची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आ. तसेच यापुढे वृक्ष/फांद्या विना परवानगी तोडण्यात येवू नये असे पत्राव्दारे फर्माविण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.५:-** मुख्याध्यापक जि.प.(मा.शा.) उर्दु माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय कॅम्प, अमरावती. विविध वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.०३/०८/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, वाढलेल्या वृक्षाच्या ४ इंच आकारापर्यंतच्या अर्जात नमुद वृक्षाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच परिसरात असलेल्या सर्व वृक्षाची मोजणी करुन त्यावर ४ इंच आकाराचे पिवळ्या पेंटवर काळ्या पेन्टनी क्रमांक घालावेत व नव्याने वृक्ष काढण्यासाठी अर्ज सादर करावा व वृक्षाची यादी सादर करण्याच्या सुचना दिल्यात . उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.५:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.६:-** श्री.रमेश मोतीरामजी वानखडे (चौकीदार), रा.मोरोपंत जोशी कॉलनी अमरावती. अज्ञात व्यक्तिंनी अवैध वृक्षतोड केल्याबाबत.



Scanned by CamScanner

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – आज दि.२४/०७/२०१९ रोजी या कार्यालयात अर्ज दिला असून श्री.अशोककुमार रतनलालजी सोनी यांच्या घराच्या आवारातील अनोळखी व्यक्तीने येवून दोन वृक्ष तोडली. असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे. मा.तांत्रिक सदस्य यांनी स्थळ निरीक्षण केले असता, पोलिसात तक्रार करावी तसेच वृक्ष प्राधिकरणाकडे विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा त्यानंतर वृक्ष प्राधिकरण अधिकृतपणे कार्यवाही करण्याच्या सुचना देईल अशा सुचना दिल्या. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.६:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य व सदर बाबत पोलिसात तक्रार दाखल करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.७:-** मा.श्री.रविभाऊ राणा आमदार बडनेरा मतदार संघ बडनेरा. १ पाम वृक्ष काढल्याची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – मा.श्री.रविभाऊ राणा आमदार बडनेरा मतदार संघ बडनेरा यांचे या कार्यालयात दिनांक २४/०७/२०१९ रोजी पत्र प्राप्त झाले असून त्यांनी पत्रामध्ये १ पाम वृक्ष पुर्णत: उन्हाने जळून नष्ट झाला व १ पाम वृक्षाचा शेंडा खराब होत आहे व वाळत आहे. तसेच बुडातुन सुध्दा खराब झाले आहे. असे अर्जदाराने नमुद केले आहे. मा.तांत्रिक सदस्य यांचा अहवाल घेण्यात आला. सदर वृक्ष उद्यान अधिक्षक श्री.प्रमोद येवतीकर यांनी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन बघीतल्याचे सांगीतले व मुळातुन सडल्याचे सांगीतले त्यानुसार १ पामवृक्ष काढण्याची परवानगी दि.२४/०७/२०१९ रोजी वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात आली असून कार्योत्तर मान्यतेसाठी सादर. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.७:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवालाप्रमाणे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.८:-** मा.सन्मा.नगरसेवक श्री.अजय सारसकर. १ कडुनिब व १ इंग्रजी चिंच वृक्ष काढण्याची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –मा.सन्मा.नगरसेवक श्री.अजय सारसकर यांनी भ्रमणध्वनीव्दारे वृक्षाची तक्रार मा.सहा.आयुक्त यांना कळविले असता, त्यानुसार अस्मिता विद्या मंदिराच्या समोरील रोड वरील झाड हे पुर्णत: मुळापासून झुकलेले असल्याचे कळविले. तसेच सदर वृक्षाची तपासणी करुन मा.सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अहवालानुसार वृक्ष तातडीने काढण्याची परवानगी उद्यान विभाग व संबंधित ठेकेदार कंत्राटदार यांना वृक्ष काढण्याची परवानगी प्रदान करण्यात आली. मा.तांत्रिक सदस्य यांचा अहवाल घेण्यात आला. वादळाने रस्त्याकडे झुकलेला व मुळातून उखडलेला वृक्ष काढण्याची तात्काळ परवानगी देण्यात आली. कार्योत्तर मान्यतेसाठी सादर. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र.८:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवालाप्रमाणे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**पुर्व झोन क्र.३**

**अर्ज क्र.१:-** श्री.ए.एस.जोशी, शाखा अभियंता मनपा, अमरावती. १५ विविध वृक्ष तोडण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२६/०७/२०१९ रोजी मा.तांत्रिक सदस्य व माजी कार्यकारी अभियंता श्री.पोतदार, सहा.अभियंता जोशी व इतर यांच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण केले असता विकासात्मक बांधकामात १५ वृक्ष काढण्याचे प्रस्तावित आहे. १५x३=४५ वृक्ष लावण्याची तजविज करावी. तसेच ४५x३=३४६०=१,५५,७००/- रुपये वृक्ष प्राधिकरण कडे ठेव ठेवण्यात यावी. वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

**ठराव क्र.१:-** सदर काम हे मनपा कडून होत असल्याने याच कामात ४१६ वृक्ष लावण्यात येत असल्याबाबत शहर अभियंता विभागाने माहिती दिली असल्याकारणाने १५ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. जी वृक्ष बांधकामात येत असेल तेच काढावी. संबंधित अभियंता यांनी जास्तीत जास्त वृक्ष वाचविण्याचा प्रयत्न करावा व ४१६ वृक्ष स्वत: च्या निरीक्षणात लावून घ्यावे व संबंधित कंत्राटदारावर सदर वृक्षाची निगा राखण्याची जबाबदारी टाकावी. या अटीवर परवानगी मान्य करण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२:-** श्री.विजयकुमार थोरात, ख्रिश्चन कब्रस्थान, काँग्रेस नगर रोड, अमरावती. २ कडुनिंब वृक्ष च्या फांद्या तोडण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०७/२०१९ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण केले असता बांधकामाच्या पुर्वेकडे असलेल्या कडुनिंबाच्या वृक्षाची भिंतीवर झुकलेली फांदी काढुन टाकण्याची तसेच पश्चिमेकडील असलेल्या कडूनिंब वृक्षाची बांधकामाकडे आलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. बांधकाम भिंतीजवळ कॅरी करुन कॉक्रिट ने बुजवावे. वृक्षाची मुळे बाधकामात जाणार नाही असे सुचवावे.

**ठराव क्र.२:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य.



Scanned by CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.३:-** श्री.अजित उत्तमराव रामेकर, अमरावती. २ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०७/२०१९ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण केले असता दोन सागवान वृक्ष ६० से.मी.पेक्षा जास्त जाडीची आहे. त्यांना सागवान धोरणानुसार परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच त्यांना दोन वृक्ष लावण्याचे फर्माविण्यात यावे.

**ठराव क्र.३:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे धोरणानुसार परवानगी देण्यात येते. तसेच त्याबदल्यात वृक्ष लागवड करुन दर सहा महिन्यांनी तीन वर्षापर्यंत अहवाल सादर करावा. व सुचविण्यात आलेली वृक्ष लागवड परवानगी प्राप्त दिनांकापासून एक महिन्याच्या आत पुर्ण करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.४:-** श्री.प्रतम नंदागवळी, रा.फ्रेजरपुरा अमरावती. ३ (कडुनिंब व इतर )वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०७/२०१९ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण केले असता अर्जदार वृक्षप्रेमी आहे. फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

**ठराव क्र.४:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे ४ इंच डायमीटर पर्यंतच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.५:-** श्री.भा.म.बिजवे रा.प्रशांत नगर अमरावती. १ चोपडीकाठसावर वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०७/२०१९ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण केले असता अर्जदार यांना वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

**ठराव क्र.५:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे ४ इंच डायमीटर पर्यंतच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.६:-** श्री.विजय हरीचंद्र खंडेलवाल रा.भुमीपुत्र कॉलनी, अमरावती. १ वाळलेले आडजात वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०७/२०१९ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण केले असता वाळलेले वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्याबदल्यात परीसरात वृक्ष लावण्याचे फर्माविण्यात यावे तसेच जामुन व पाफळा वृक्ष छान वाढलेला आहे. कंम्पाऊंड वॉल करतांना इनर रिंग करुन वृक्षाला त्याच स्थितीत राहु द्यावे वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

**ठराव क्र.६:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. त्याबदल्यात वृक्ष लागवड करुन दर सहा महिन्यांनी तीन वर्षापर्यंत अहवाल सादर करावा. व सुचविण्यात आलेली वृक्ष लागवड परवानगी प्राप्त दिनांकापासून एक महिन्याच्या आत पुर्ण करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.७:-** श्री.एन.एम.तिखीले(सहा.अभियंता) झोन क्र.३ मनपा, अमरावती. १ आंबा, १ सिताफळ व (इतर फुलझाड) वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –उपरोक्त प्रकरणी दि.०६/०६/२०१९ व दि.१९/०६/२०१९ रोजी प्रत्यक्ष भेटी दिल्यात दुसऱ्या व तिसऱ्या भेटींच्या वेळी श्री.तिरपुडे व श्री.तिखीले हे हजर होते. परंतु या प्रकरणी न्यायालयाने श्री.ठुनुकले यांचे विरुध्द निर्णय दिला असल्याचे कोणीही लक्षात आणुन दिले नाही. मनपा कडून या आगोदर श्री. ठुनुकले यांचे अतिक्रमण हटविले होते. परंतु श्री. ठुनुकले यांनी पुन्हा अतिक्रमण करुन वृक्ष लागवड व कम्पाऊंड घातले आहे. न्यायालयाचा निर्णय स्पष्ट असल्याने श्री. ठुनुकले यांनी केलेले अतिक्रमण हटवुन व वृक्ष सुध्दा काढावे व वृक्षाचे दुसरीकडे पुन:रोपीत करावे व मंजुर असलेला रस्ता पुर्ण करावा. अतिक्रमीत जागेवरील फुलझाडे, वेली व वृक्ष काढण्यास हरकत नाही. तसेच मनपा बांधकाम विभाग न्यायालयात पार्टी असतांना बांधकाम विभागाने ही बाब वृक्ष प्राधिकरण च्या लक्षात का आणुन दिली नाही याची स्वतंत्र विचारणा प्रशासनाने करावी.

**ठराव क्र.७:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य सर्व अतिक्रमन काढण्यात येवून त्यासोबतच रस्त्यावर येणारी वृक्ष सुध्दा काढण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.८:-** श्री.मनोहर उत्तमराव केने रा.ज्योतिबा फुले कॉलनी अमरावती. ४ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –उपरोक्त प्रकरणात दि.०९/०७/२०१९ रोजी झालेल्या सभेत सदर वृक्षाची पुन:पाहणी करण्याचे सुचविले होते. त्यानुसार दि.१८/०७/२०१९ रोजी मा.नगरसेवक श्री.अजय गोंडाणे यांनी मा.तांत्रिक सदस्य यांच्या अहवालाप्रमाणे



Scanned by CamScanner

३ सागवान वृक्ष धोरणानुसार तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. मा.तांत्रिक सदस्य यांच्या अहवालानुसार कार्यवही करण्याचे सुचविले आहे.

**ठराव क्र.८:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. धोरणानुसार परवानगी देण्यात येत आहे. त्याबदल्यात वृक्ष लागवड करुन दर सहा महिन्यांनी तीन वर्षापर्यंत अहवाल सादर करावा. व सुचविण्यात आलेली वृक्ष लागवड परवानगी प्राप्त दिनांकापासून एक महिन्याच्या आत पुर्ण करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.९:-** ॲड. माधुरी ज्ञानेश्वर देशमुख रा.प्रभु कॉलनी, अमरावती. ४ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –उपरोक्त प्रकरणात दि.०९/०७/२०१९ रोजी झालेल्या मागील वृक्ष प्राधिकरण सभेत सदर सागवान वृक्षाची पुन:पाहणी करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार दि.१८/०७/२०१९ रोजी मा.नगरसेवक श्री.अजय गोंडाणे यांना मा.तांत्रिक सदस्य यांच्या अहवालाप्रमाणे २ सागवान वृक्ष तोडण्याची धोरणानुसार परवानगी देण्यात यावे असे सुचविले आहे.

**ठराव क्र.९:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. धोरणानुसार परवानगी देण्यात येत आहे. त्याबदल्यात वृक्ष लागवड करुन दर सहा महिन्यांनी तीन वर्षापर्यंत अहवाल सादर करावा. व सुचविण्यात आलेली वृक्ष लागवड परवानगी प्राप्त दिनांकापासून एक महिन्याच्या आत पुर्ण करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१०:-** सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती. विविध वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल - दि.०९/०७/२०१९ रोजी वृक्ष प्राधिकरण बैठकित ठरल्याप्रमाणे पुन:पाहणीतुन काही वृक्ष वाचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. अर्जदार दि.२८/०६/२०१९ नुसार १२४ वृक्ष तोडण्याची परवानगी मागीतली होती. पाहणी नंतर ७७ वृक्ष वाचविण्यात आले. अर्जदाराने सोबत जोडलेल्या यादीनुसार ४७ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्या बदल्यात ४७x३=१४१ वृक्ष लावण्याचे व ३ वर्षापर्यंत जगविण्याचे तसेच सहा महिने अहवाल पाठविण्याचे फरमाविण्यात यावे. त्याचबरोबर १४१x३४६०=४,८७,८६०/- रुपये (चार लक्ष सत्त्याऐंशी हजार आठशे साठ रुपये फक्त) वृक्ष प्राधिकरण कडे ठेव म्हणुन जमा केल्या नंतर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात यावी. तसेच रस्त्याचे काम करतांना प्रथम येणारे अडथळे हटविण्यात यावे. व सर्वात शेवटी वृक्ष् काढण्यात यावे.

**ठराव क्र.१०:-** सा.बां.विभागातर्फे श्री.घोमकाळे असि.इंजीनीअर व इतर दोन असि.इंजिनीअर यांनी सदर वृक्ष ट्रान्सप्लान्ट करु शकता येतील याबाबतचा दुजोरा दिलेला आहे. त्यामुळे प्रथम सदर रस्त्यावरील वृक्ष जास्तीत जास्त ट्रान्सप्लान्ट करावी व दुसरीकडे संत गाडगे बाबा विद्यापीठ अमरावती आवारात अथवा मनपाच्या उद्यानात किंवा त्याच रस्त्याचे कडेला वृक्ष काढून पुन:रोपीत करण्यात यावी यासाठी प्रथम प्रयत्न करावा. वृक्ष तोडण्याची परवानगी अर्जदारास देण्यात येत आहे, त्या वृक्षाबदलीत १४१ वृक्ष लागवड करावी त्याबदली ४८७८६०/- रुपये ठेव ठेवण्यात यावी. तसेच उर्वरीत सर्व वृक्षांना दगडी आळे(१x१ मीटर) करुन वृक्ष निगा राखण्याचे काम अर्जदारांनी करावे. तसेच रस्त्याचे दुतर्फा प्रति ४ मीटर दर वृक्ष लावल्या जातील याची काळजी घ्यावी व अहवाल दर सहा महिण्यांनी वृक्ष अधिकारी (झोन क्र १ व झोन क्र.३) यांना सादर करावा. या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.११:-** श्री.इरफान खान रहेमान खान रा.व्यंकय्यापुरा, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०७/२०१९ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण केले असता कडूनिंब वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. सबब, वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

**ठराव क्र.११:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१२:-** डॉ.श्री.दिलीप जाणे रा.रुख्मीणी नगर, अमरावती. १ अशोका वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – डॉ.श्री.दिलीप जाणे यांनी आगोदर सुध्दा दि.१५/१०/२०१६ व दि.०४/१०/२०१८ रोजी सदर वृक्षाबाबत अर्ज केला होता. तेव्हा त्यांना परवानगी नाकारली होती. दि.१२/०७/२०१९ रोजी सदर अर्जदार यांनी पुन्हा अशोक वृक्ष तोडण्याकरीता अर्ज सादर केला आहे.

**ठराव क्र.१२:-** सदर परवानगी नाकरण्यात येते व वृक्ष जगविण्याबाबत व वृक्षास कुठलीही हानी पोहचू नये याबाबत पत्र द्यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१३:-** श्रीमती प्रतिक्षा किशोर वाहणे व इतर नागरीक रा.यशोदा नगर १, अमरावती. १ पिंपळ वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.



Scanned by CamScanner

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०७/२०१९ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण केले असता वृक्ष छान वाढलेला हिरवागार आहे. ज्या घराजवळ वृक्ष वाढलेला आहे त्यांनी वृक्षाच्या आडोशाने अतिक्रमण केले होते. मनपा ने ते अतिक्रमण काढले आहे. वृक्षा पर्यंतचे कॉक्रिट काढुन टाकण्यात यावे. तसेच वृक्षाच्या आडोशाने पुन्हा अतिक्रमण होणार नाही याबाबत प्रशासनाने दक्षता घ्यावी. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

**ठराव क्र.१३:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१४:-** श्री.विजय हरीचंद्र खंडेलवाल रा.कॉंग्रेस नगर, अमरावती. ३ (वाळलेले आडजात) वृक्ष/फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता विज पुरवठा खडीत होतो असे विद्युत मंडळास दिसुन येत असल्यास तारेकडे झुकलेल्या फांद्या विद्युत मंडळाने पुर्व सुचना देवून काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. यापूर्वी सदर अर्जदारास अवैध वृक्षतोड केल्या प्रकरणी दंड करण्याचे आदेशीत केले आहे. त्यांनी अद्याप दंड भरलेला नाही. सबब, दंडाची रक्कम भरण्याचे आदेशित करावे दंड न भरल्यास घर टॅक्स मध्ये जोडून वसूल करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

**ठराव क्र.१४:-** सदर दंडाची टॅक्स मध्ये नोंद घेवून देयक पाठवावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१५:-** श्री.गजानन भुसारी रा.यशोदा नगर नं.२, अमरावती. १ शिसव वृक्ष च्या फांद्या काढल्याबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.०५/०७/२०१९ रोजी श्री.पंकज तट्टे (स्वास्थ निरीक्षक) हे प्रभागात पाहणी करीत असतांना गजानन भुसारी यांचे खाली प्लॉट मधील एक शिसव वृक्षाच्या फांद्या पुर्ण तोडल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांना विनापरवानगी वृक्ष तोडल्यामुळे तुमच्याविरुध्द ५ हजार रुपयाची दंडात्मक कार्यवाही का करण्यात येवू नये? अशी नोटीस बजावण्यात आली होती. त्यावर गजानन भुसारी यांनी पावसामुळे फांदी तुटली होती. व ती फांद्यी इलेक्ट्रीक वायरला लागत होती. भितीमुळे आम्ही ती फांद्यी छाटली. असे नोटीसला उत्तर गजानन भुसारी यांनी दिले आहे.

**ठराव क्र.१५:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१६:-** कारागृह अधिक्षक मध्यवर्ती कारागृह, अमरावती. वृक्ष च्या फांद्या काढण्याबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०७/२०१९ रोजी मा.तांत्रीक सदस्य यांच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण केले असता वृक्षाच्या फांद्या छाटण्याची माहिती देण्यात आली. कोणत्या वृक्षाच्या फांद्या व केव्हा छाटण्यात आल्या याची माहिती व वृक्षाची तपशिल द्यावा अशा सुचना श्री.गजानन पाटील यांना देण्यात आल्या.

**ठराव क्र.१६:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१७:-** श्री.आर.एम.लोखंडे, अमरावती. विविध वृक्ष / वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.२९/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता शासकिय तंत्रनिकेतन शाळेचा परीसर मोठा असून २०० ते ३०० वृक्ष आहेत. तेव्हा सर्व वृक्षाची मोजणी करुन त्यांना लाल रंगाने क्रमांक टाकुन त्यापैकी कोणत्या-क्रमांकाचे वृक्ष तोडावयाचे आहे त्या वृक्षाच्या नावासहित यादी सादर करावी. त्यानंतर वाळलेली व धोकादायक, हिरवी असलेल्या वृक्षांना काढण्याची परवानगी द्यायची याचा निर्णय वृक्ष प्राधिकरण सभेत करण्यात येईल.

**ठराव क्र.१७:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून तातडीने तसे पत्र द्यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१८:-** श्री.आर.बी.पुनकर, मुख्याध्यापक, प्रशांत नगर विद्यालय, अमरावती. १ शिकस्त वृक्ष काढण्याची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल –दि.१८/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता वृक्ष अर्धवट वाळलेला असून किड लागलेली आहे. सार्वजनिक रस्त्यावर शाळेजवळ असलेला वृक्ष केव्हाही कोसळण्याची शक्यता होती. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरी देण्यात यावी. त्या वृक्षाचे बदल्यात तिन वृक्ष लावण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

**ठराव क्र.१८:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

झोन क्र. ४ :-

**अर्ज क्र.१:**-श्रीमती रेश्मा वाकोडे रा. वसंत नाईक कॉलनी, अमरावती. १ सुकलेले वृक्ष काढण्याची परवानगी देणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.३१/०६/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले, वृक्ष सुकलेले आहे, सदर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी देण्यास हरकत नाही. मंजुरीस सादर.
**ठराव क्र.१:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे परवानगी देण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२:**-श्री.प्रमोद अ.देशमुख रा.शंकर नगर, अमरावती. १ सुकलेले नारळ वृक्ष काढण्याची परवानगी देणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.३१/०६/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले, नारळाचे वृक्ष अर्जदाराच्या घराच्या परिसरात आहे. सदर वृक्ष सुकले असल्याने त्यास काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. बरोबर त्याच जागेवर दुसरे स्थानिक परीसरात वृक्ष लावून अहवाल वृक्ष प्राधिकरणास पाठवावा. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी देण्यास हरकत नाही. मंजुरीस सादर.

**ठराव क्र.२:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे परवानगी देण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.३:**-श्री.ज्ञानेश्वरराव ओगले रा.मधुचंद्र कॉलनी बडनेरा. १ सुकलेले गुलमोहर वृक्ष काढण्याची परवानगी देणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०९/०८/२०१९ रोजी मा.सहा.आयुक्त् व तांत्रिक सदस्य यांचे मार्फत संयुक्त पाहणी करण्यात आली असता. मनपाने काढुन हिंदु स्मशानभुमी येथे देण्यासाठी कार्यवाही करावी. वृक्ष् सार्वजनिक ठिकाणी असल्याने वृक्ष् सुकलेले आहे. वृक्ष् कापण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. याबदलीत वृक्ष् मनपाने लावावे. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी देण्यास हरकत नाही. मंजुरीस सादर.

**ठराव क्र.३:**- सदर वृक्ष काढण्याची परवानगी मान्य करण्यात येत असून संबंधित झोन चे प्रतिनिधी सदर ठिकाणी उपस्थित ठेवून कंत्राटदार मार्फत काढण्यात यावी. तसेच विद्युत तारा जवळ असल्यास म.रा.वि.वि.कंपणीला पत्र देवून प्रथमत:वेळ घ्यावी व विद्युत प्रवाह बंद करुन घ्यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.४:**-श्री.दिलीप हरताळकर रा.चंद्रवती नगर, साई नगर, अमरावती. १ कडुनिंब वृक्ष/फांद्या काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.३१/०६/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता. कडुनिंबाचे वृक्ष् रस्त्याच्या कडेला छान वाढलेले व हिरवेगार आहे. कोणतीही अडचण दिसुन आली नाही. सबब वृक्ष/फांद्या तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. अर्जदाराने वृक्षाला कोणतीही इजा पोचवू नये असे कळविण्यात यावे, झाडाच्या बुडापर्यंत केलेले कॉंक्रिटीकरण काढण्याच्या सुचना देण्यात याव्यात. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. मंजुरीस सादर.
**ठराव क्र.४:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.५:**-कु.अनिता गायकवाड रा.नविवस्ती बडनेरा. १ काटसावर वृक्ष/फांद्या काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.
वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०९/०८/२०१९ रोजी मा.सहा.आयुक्त व तांत्रिक सदस्य यांचे मार्फत संयुक्त पाहणी करण्यात आली असता, वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. अर्जदाराने वृक्षाला इजा पोहचवू नये असे कळविण्यात यावे. काटसावरचे वृक्ष छान वाढलेले व हिरवेगार आहे. वृक्ष् नालीच्या काठावर असल्याने नाली खचलेली आहे. खचलेली नाली स्वच्छता विभागाचे अहवालानंतर दुरुस्त करण्यात यावी. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी नाकारण्यात येत आहे. मंजुरीस सादर.

**ठराव क्र.५:**- वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.६:**- सौ.ज्योती जिरापुरे रा.शंकर नगर रोड बालाजी नगर अमरावती. १ आंबा वृक्ष/फांद्या काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०९/०८/२०१९ रोजी मा.सहा.आयुक्त व तांत्रिक सदस्य यांचे मार्फत संयुक्त पाहणी करण्यात आली असता, आंब्याचे झाड अर्जदाराचे घरातील आवारात छान वाढलेले आहे. विद्युत तारेकडे झुकलेल्या बारीक फांद्या तोडण्याची परवानगी देण्यात येत आहे. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येते. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी नाकारण्यात येत आहे. मंजुरीस सादर.



Scanned by CamScanner

**ठराव क्र.६:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे ४ इंच डायमीटर पर्यंतच्या आवश्यक फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येते व वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.७:-** श्री.नागोराव बाळकृष्ण भालेराव रा. मराठा कॉलनी गोपाल नगर, अमरावती. १ प्लेटो फार्म वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.३१/०६/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले, वृक्ष रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवेगार आहे. तारेकडे झुकलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात हरकत नाही. सदर फांद्या शक्तीमान मशिनने काढावे लागेल. मंजुरीस सादर.

**ठराव क्र.७:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य. तारांना स्पर्श करणाऱ्या फांद्या काढण्याबाबत म.रा.वि.वि.कंपणीला पत्र देण्यात यावे व आवश्यक्ता पडल्यास उद्यान विभागाने शक्तीमान मशिन पुरवावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.८:-** श्री.सैय्यद आरिफ रा.शिवाजी नगर नवीवस्ती, बडनेरा. १ चिंचोल वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.३१/०६/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले, वृक्ष भारतीय रेल्वेच्या मोकळ्या जागेत छान वाढलेले व हिरवेगार आहे. व कोणतीही अडचण नाही. रेल्वे व्यवस्थापनाची जागा असून रेल्वे विभागाचे तेथील सर्व वृक्ष लावलेले व वाढविलेले आहेत. रेल्वेच्या सहमतीने वृक्षाच्या फांद्या काढण्याकरीता परवानगी देण्यास हरकत नाही. मंजुरीस सादर.

**ठराव क्र.८:-** प्रथम संबंधित रेल्वे विभागाकडून नाहरकत बोलवावे त्यानंतर ४ इंच डायमीटर पर्यंतच्या काढण्याची परवानगी द्यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.९:-** श्री.सागर राऊ रा. सुदर्शन बिल्डींग शंकर नगर, अमरावती. १ साग वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०९/०८/२०१९ रोजी मा.सहा.आयुक्त व तांत्रिक सदस्य यांचे मार्फत संयुक्त पाहणी करण्यात आली. सदर वृक्ष् अर्जदाराच्या जागेत असून सुकलेले आहे. धोरणानुसार काढण्यासाठी आदेशित करावे लागेल. एकास एक वृक्ष लावण्याची ठेव भरण्याकरीता कळवावे लागेल. वृक्ष् सुकलेले असून तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी देण्यास हरकत नाही. मंजुरीस सादर.

**ठराव क्र.९:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१०:-** श्री.डी.आर.हिंगे रा.दत्त कॉलनी जुनीवस्ती, बडनेरा. १ कडुनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०९/०८/२०१९ रोजी मा.सहा.आयुक्त व तांत्रिक सदस्य यांचे मार्फत संयुक्त पाहणी करण्यात आली असता, कडुनिंब वृक्षाच्या दोन इंच जाडीच्या पर्यंत फांद्या काढण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. मंजुरीस सादर.

**ठराव क्र.१०:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे परवानगी देण्यात येते.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.११:-** श्री.जगन्नाथ भगवानदीन यादव रा.नविवस्ती बडनेरा. १ कडुनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०९/०८/२०१९ रोजी मा.सहा.आयुक्त व तांत्रिक सदस्य यांचे मार्फत संयुक्त पाहणी करण्यात आली असता, कडुनिंबाचे वृक्ष छान वाढलेले असून सार्वजनिक जागेवर आहे. संबंधितांनी त्या वृक्षापर्यंत अतिक्रमण केले आहे. मनपाने त्वरीत अतिक्रमण काढुन कार्यवाही करावी. घराकडे झुकलेल्या २ इंच आकारापर्यंतच्या बारीक फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. मंजुरीस सादर.

**ठराव क्र.११:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत असून अहवालाप्रमाणे तातडीने कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१२:-** श्री.जे.एन.वानखडे रा.म्हाडा कॉलनी, नवी वस्ती बडनेरा. १ कडुनिंब वृक्ष / फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०९/०८/२०१९ रोजी मा.सहा.आयुक्त व तांत्रिक सदस्य यांचे मार्फत संयुक्त पाहणी करण्यात आली सदर कडूनिंबाचे वृक्ष सार्वजनिक ठिकाणी असून छान वाढलेले व हिरवेगार आहे. विद्युत तारेकडे झुकलेले दोन इंच



Scanned by CamScanner

जाडीच्या फांद्या शक्तिमान मशीनव्दारे काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. मंजुरीस सादर.

**ठराव क्र.१२:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.१३:-** श्री.अशोकराव दाजीबाजी तट्टे रा.विजय नगर गोपाल नगर, अमरावती. १ आंबा वृक्षाला इजा झाल्याबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – दि.०९/०८/२०१९ रोजी मा.सहा.आयुक्त व तांत्रिक सदस्य यांचे मार्फत संयुक्त पाहणी करण्यात आली आंबा वृक्ष हिरवेगार व छान वाढलेले रस्त्याकडे आहे. झाडाच्या खोडापर्यंत अर्जदाराने टिन शेड उभारल्याने वृक्षास इजा झाल्या आहे. त्वरीत टिन शेड हटविण्याचे आदेश करण्यात यावेत व वृक्षला इजा पोहचु नये असे बजावण्यात यावे. मंजुरीस सादर

**ठराव क्र.१३:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**झोन क्र. ५ :-**

**अर्ज क्र.१:-** श्री.मंगेश भा.चौधरी रा.महालक्ष्मी नगर रवी नगर मागे, अमरावती. १ कडुनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता कडुनिंब वृक्ष हिरवेगार व छान वाढलेले आहेत. झाडाच्या फांद्या मोठ्या प्रमाणात वाढल्या असून झाड ऐकीकडे वाकलेले आहे. वृक्षाची काही फांद्या विजेच्या ताराला स्पर्श करतात म्हणुन विद्युत ताराला स्पर्श करणाऱ्या व एकिकडे मोठ्या प्रमाणात झुकलेल्या फांद्या छाटण्यात परवानगी देण्यात हरकत नसावी.

**ठराव क्र.१:-** विद्युत तारांना स्पर्श करणाऱ्या फांद्या काढण्याकरीता म.रा.वि.वि.कंपणीला पत्र देण्यात यावे व एकीकडे झुकलेल्या फांद्या काढण्याची आवश्यक्तेनुसार परवानगी द्यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२:-** श्री.अरुण दौलतराव चौहान रा.गजानन मंदीर जवळ अमरावती. १ कडुनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – अर्जदाराने झाड तोडण्याची परवानगी मागीतलेली आहे. परंतु तांत्रिक सदस्य यांची पाहणी झाली नसल्याने अहवाल प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केल्यानंतर सादर केल्या जाईल.

**ठराव क्र.२:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे पाहणी अहवाल सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.३:-** श्री.नंदकिशोर पुंडलिकराव नागपुरकर रा.महादेव नगर आदिवासी हॉस्टेल समोर आकोली रोड, अमरावती. १ कडुनिंब वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता कडुनिंब वृक्ष हिरवेगार व छान वाढलेले आहेत. वृक्षाच्या काही फांद्या विजेच्या ताराला स्पर्श करत आहे म्हणुन विद्युत ताराला स्पर्श करणाऱ्या फांद्या छाटण्याकरीता परवानगी देण्यात हरकत नसावी

**ठराव क्र.३:-.** विद्युत तारांना स्पर्श करणाऱ्या फांद्या काढण्याकरीता म.रा.वि.वि.कंपणीला पत्र देण्यात यावे

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.४:-** श्रीमती अंजनाबाई जगन्नाथ हिरुळकर रा.महाजनपुरा रोड आनंद नगर, अमरावती. १ पिंपळ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता झाड हिरवेगार व छान वाढलेले आहेत. झाडाच्या काही फांद्या अर्जदार यांचे घरावर येत असलेले व धोकादायक असलेल्या ३ ते ४ इंच डायमीटर असलेले फांद्या तोडण्यातची परवानगी देण्यात यावी.

**ठराव क्र.४:-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.५:-** श्री.मो.तालीब मो.इब्राहिम रा.सानिया सुपर किराणा समोर जमील कॉलनी, अमरावती. १ भिंगरी वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल – प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता झाड हिरवेगार व छान वाढलेले आहेत. व झाडापासून अर्जदारास कोणताही त्रास होत नाही. झाड तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

**ठराव क्र.५:-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे परवानगी नाकारण्यात येते.



Scanned by CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र.४ :- मा.सभापती, यांचे मंजुरीने वेळेवर येणारे विषय.**

**अर्ज क्र.१:-** प्रा.डॉ.अरुणा हाडके रा.३२ जिजाऊ नगर, महापौर बंगल्यासमोर, विद्यापिठ रोड अमरावती.

विषय :- १ कडूनिंब वृक्ष काढण्याबाबत.

**ठराव क्र.१:-** अर्ज दाखल करुन घेवून तांत्रिक सदस्यांसोबत पाहणी करण्यात यावी व आवश्यक तो निर्णय घेवून कार्यवाही करावी व अहवाल पुढील सभेत सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.२:-** श्री.वि.म. येवतीकर, रा.नरहरी नगर, राजापेठ अमरावती.

विषय :- बोर या जातीच्या वाळलेल्या व धोकादायक फांद्या काढणेबाबत व चिकु या प्रजातीच्या अतिशय जास्त वाढलेल्या फांद्या काढणेबाबत.

**ठराव क्र.२:-** सदर विषयाच्या अनुषंगाने वृक्ष अधिकारी यांनी पाहणी करुन आवश्यक फांद्या काढण्याची परवानगी देण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र.३:-** रॉय उद्योग लिमीटेड/नवलकुमार देवकरणजी भूत, अमरावती.

विषय :- वृक्ष लावण्याकरीता परवानगी मिळणेबाबत.

**ठराव क्र.३:-** मनपा क्षेत्रातील जागा वृक्ष लागवडीकरीता उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच वृक्ष लागवडीचा अहवाल दर सहा महिन्यांनी तीन वर्षापर्यंत जी.पी.एस. फोटोसह वृक्ष प्राधिकरण समितीला कळविण्याबाबत पत्र देण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

वृक्ष प्राधिकरण समितीकडे वृक्ष काढण्याबाबत ज्या अर्जदारांच्या ठेवी जमा आहेत त्यांचा वृक्ष पुन:रोपनाबाबतचा सहा महिन्यांचा अहवाल मागवावा व अहवाल प्राप्त न झाल्यास ठेव जप्त करण्यात यावी. असे निर्देश मा.सभापती तथा आयुक्त महोदय यांचेकडून देण्यात आले. तसेच ३३ कोटी वृक्ष लागवड व अटल आनंद घनवन बाबत सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. यानंतर कार्यक्रम पत्रीकेवरील विषय संपुष्टात आल्यामुळे उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**सभापती तथा आयुक्त,**
**महानगरपालिका अमरावती**

① प्रत सहा. आयुक्त झोन १ उत्तरझोन — 12/9/19.
② —"— —"— 2 मध्यझोन — 12/9/19
③ —"— —"— 3 पूर्वझोन 12/9/19
④ —"— —"— 4 पश्चिमझोन 12-9-19
⑤ —"— —"— 5 दक्षिणझोन — 13/9/19



Scanned by CamScanner